# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.२३/०२/२०१९

## <u>दि.२२/०२/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७९/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | अविनाश चौहान, वय ३० वर्षे,रा. मानखुर्द,मुंबई |
| **आरोपी** | अनुपकुमार साहु,वय ३५ वर्षे, रा.कमीसन रोड,कटटक मंगलबर्ग कटटक,ओडीसा (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मार्च २०१७ ते दि.२३/१०/१७ फ्रेश ॲन्ड क्वीक रंस्टॉरंट,सी ३१ रोहन प्लाझा डी.पी.रोड साडेसतरानळी, हडपसर व आयसीआयसीआय बँक,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांचेकडे कुक म्हणुन कामाला असणारा इसम अनुपकुमार साहु, त्याने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, फिर्यादी यांचे नाव असलेले रेस्टॉरन्टचे खातेतुन परस्पर फिर्यादी यांना माहीती न देता विश्वासघात करुन २,६२,०१३/-रु मोबी क्वीक वॉलेटमधुन काढुन तसेच एटीएम, ऑनलाईन, ट्रान्सफर करुन फिर्यादी यांचा विश्वासघात करुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) शिंदे ८३८००७१९६२ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ७९/१९,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय २२ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/२०१८ रोजी ते दि.१३/०९/२०१८ रोजीचे दरम्यान गिरीधर ॲव्हेनिव्ह, कोथरुड, बिग बाजारचे समोर,कोथरुड,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांचे मोबाईल फोनवर अनोळखी इसमाने फोन करुन, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन, त्यांना गिफ्ट लागले आहे असे भासवुन त्यांना ५ हजार ४९०/- रु. ची खरेदी करण्यास भाग पाडुन, वेळोवेळी बँक खातेवर गुगल पे व्दारे पैसे भरण्यास लावुन, एकुण ५३ हजार ४९४/- रु.ची फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी.एन.खांडेकर ७८८८०४२९११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ५९/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | सलिम शेख,वय-५६ वर्षे, सुभाष पेठ,औरंगाबाद |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०२/२०१९ रोजी सायं.१८/२७ वा.सुमारास जे.एम.रोड शिवप्रताप लॉज समोरुन डेक्कन,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचेकडील शासकिय वाहन हे पार्क करुन थांबले असता,यातील एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांच्या गाडीचे उजव्या टायरकडे हाताने इशारा करुन पैसे पडल्याचा बहाना करुन, लक्ष विचलीत करुन, दुस-या अनोळखी इसमाने फिर्यादीचे संमती शिवाय लबाडीचे इराद्याने फिर्यादी यांचे गाडीतल पुढील सिटवर असलेली बॅग त्यामध्ये एक मोबाईल, एक अंगठी, रोख रक्कम ४ हजार रु. व इतर कागदपत्रे असा एकुण ३९ हजार रु.किं.चा माल चोरी करुन चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. डी.आर.पांचाळ ९९२३१४५८०९ |

## दि.२३/०२/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे १७९/१९,भादविक ४२०,४०६ |
| **फिर्यादी** | अशोक खत्री, वय ५६ वर्षे, रा.गुलटेकडी,पुणे. |
| **आरोपी** | राजेंद्र मुधूसुदन पाटील, वय ५१ वर्षे, रा.चंदन कलोजियम,फ्लॅट नं.१०३, वाकड पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | जुन २०१८ ते दिनांक २३/०२/२०१९ रोजी पर्यंत दिल्ली डाऊन टाऊन खानावळ,दिपबंगला चौक, मॉडर्न कॉलनी,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे दिल्ली डाऊन टाऊन खानावळ,दिपबंगला चौक,मॉडेल कॉलनी पुणे येथे कामास असणारा इसम नामे-राजेंद्र मुधूसुदन पाटील,रा.चंदन कलोजियम,फ्लॅट नं.१०३, वाकड पुणे याने फिर्यादी व फिर्यादी यांचा मुलगा उदय खत्री तसेच त्याचे मित्रांचा, इतर लोकांचा विश्वास संपादन करून, जुलै २०१८ ते आज रोजी पर्यंत फिर्यादी यांचेकडून व फिर्यादी यांचा मुलगा उदय खत्री, त्याचे मित्र ह्रतिक दिपक ग्रोवर यांचेकडून देशी व आतंरदेशीय विमानाचे प्रवासाचे तिकीटांसाठी एकूण २,९६,८७६/-रूपये ऑनलाईन व रोख स्वरूपात घेवून त्यांची आर्थिक फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. अे.पी.मदने ९७०२१४००७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ११७/१९,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | शाम तुपे, वय ३४ वर्षे,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | रविंद्र शिवाजी उमापे, वय ३३ वर्षे,रा.पाटील इस्टेट शिवाजीनगर, पुणे (जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०२/२०१९ रोजी रात्रौ २१/०० वा.चे सुमारास संगमवाडी, ट्रव्हल्स पार्किंग समोर बीआरटी मार्गावर येरवडा,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र नामे- विकास देविदास भोसले, वय ३५ वर्षे, रा.धानोरी रोड, धानोरी,पुणे असे मोटार सायकलवरुन जात असताना, यातील नमुद इसम रविंद्र उमापे, याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वेडी वाकडी चालवुन, फिर्यादी यांचे मोटार सायकलला जबर ठोस मारून, फिर्यादी यांना जखमी करून, फिर्यादी यांचा मित्र-विकास भोसले, याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विनोद शिंदे ९८५०८४९५२५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

# प्रेसनोट

दिनांक ०६/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिंन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ पर्यंत नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६

# Police in Action
## for Service & Security of People

Pune Police






## Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**





Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**

2nd: **Rs. 3,000**

3rd: **Rs. 2,000**

Two more consolation prizes

To take part & know more, go to

**www.pixlent.com/punepolicephotocontest**

**Entry Free!**

Last Date: **25 February 2019**